


कोणाला माहीत पण नाही की वेळ कोठे निघून जातो. त्या मुलांना बघा. त्यांना आज शाळेसाठी उशिर झाला आहे. म्हणून ते सर्व धावत आहेत. पहा, ज्यांचे चप्पल तुटले आहे त्या शाळेच्या शिक्षिका आहे. कदाचित त्यांना म्हणून उशिर झाला असेल. त्या जग्गुभाई जवळ चप्पल दुरूस्त करण्यासाठी जात आहेत. जग्गुभाईला पण भल्या पहाटे थोडे पैसे मिळतील.

---

पाठ शिकविण्या अगोदर बालकांना चित्राचे अवलोकन करण्याची आणि समजण्याची संधी द्यावी. बालकांमध्ये चित्राचे अवलोकन करण्याच्या कौशल्याचा विकास होते हे महत्त्वाचे आहे.

चंपा फुलांनी भरलेल्या टोपल्यासोबत तिथे बसली आहे. पोस्ट ऑफिसमध्ये काम करणारी महिला तिच्या जवळून दररोज फूले खरेदी करते.

बांधकाम पुन्हा सुरू झाले आहे. ट्रक सामान आणत आहेत. कारीगर पुन्हा संपूर्ण दिवस कामात व्यस्त होतील.

तेथे पहा, डॉक्टर आणि नर्स सोबतच दवाखान्यात जात आहेत.

पहा रायजी त्याच्या फळांच्या लारी सोबत आहे. या दिवसांमध्ये तो स्वत:सोबत ममताला आणतो. ममता फळे देण्यासाठी व पैसे वसूल करण्यासाठी, आजूबाजूला धावते.

नानु न्हाव्याने त्याचे दुकान उघडले आहे, पण तो कोणाची दाढी करेल?

चार रस्त्यावर इकबालसिंघ उभा आहे. पूर्ण दिवस, तो त्याची व्हिसल वाजवतो आणि आरोळ्या मारतो – ‘‘तुमचे वाहन येथून हलवा. ऐऐ...ऐ..ऐ.. ओय तुम्ही माझे ऐकले नाही... गाडी दूर घेऊन जा.’’

असे, सांगून रमेश स्वत:चा खाली कप ठेऊन जवळच्या दुकानाकडे गेला.

माणसे चार रस्त्यावर आणि आठवडे बाजारात कशा रितीने स्वत:चा सामान विकतात?

## विचार करा आणि लिहा :

❋ चित्र पहा आणि वेग–वेगळे लोक काय काम करीत आहे ते लिहा :

❇ तुमच्या शेजारी राहणारे लोक कशा प्रकारची कामे करतात? कोणत्याही पांच कामांची नावे लिहा. या कारीगरांना काय म्हणतात.

| काम | त्यांना काय म्हणतात? |
|---|---|
| कार आणि स्कूटरला दुरूस्त करणारा | मिकेनिक |
| ______________________ | ______________________ |
| ______________________ | ______________________ |
| ______________________ | ______________________ |
| ______________________ | ______________________ |
| ______________________ | ______________________ |



खाली यादी दिलेली आहे. तुम्ही पाहिलेल्या या घरांवर ● करा. तुमच्या जवळपासच्या विस्तारात असलेल्या बहुमाळी घरांवर पण ● करा.

| | | |
|---|---|---|
| ○ पोस्ट ऑफिस | ○ हॉस्पिटल | ○ मंदिर |
| ○ टेलिफोन बूथ | ○ शाळा | ○ कॉलेज |
| ○ सरकारी कचेरी | ○ चर्च | ○ बहुमाळी घर |
| ○ धर्मशाळा | ○ हॉटेल | ○ बस स्टॅन्ड |
| ○ सिनेमा हॉल | ○ पोलिस स्टेशन | ○ बँक |
| ○ पेट्रोल पंप | ○ दुकान | ○ गुरुद्वारा |
| ○ मस्जिद | ○ रेल्वे स्टेशन | ○ न्यायालय(कोर्ट) |



## विचार करा आणि सांगा :

❇ कोणत्याची पाच घरांची नावे आणि तेथे कोण कोणती कामे होतात ते लिहा :

| घरांचे नाव | होणारे काम |
|---|---|
| दवाखाना | ● रोग्यांचा उपचार<br>● बालकांसाठी लसीकरण |
| ______________________ | ______________________ |
| ______________________ | ______________________ |
| ______________________ | ______________________ |
| ______________________ | ______________________ |
| ______________________ | ______________________ |

चित्रात तुम्ही पाहिले की नवीन घर बनविण्यासाठी पुष्कळ लोक तिथे काम करीत होते. शाळा पण अशी जागा आहे, जेथे अनेक लोक जुळलेली असतात.

❇ शाळेत कोणती काम होतात ते लिहा.

| | |
|---|---|
| | |
| | |
| | |

❇ चित्रात काही अशी बालके आहेत जे शाळेत जात नाही ? ते काय करीत आहेत ?

______________________________________________

______________________________________________

## घरकाम :

दिपाली पण एक अशीच मुलगी आहे, जी शाळेत जात नाही. चला तिच्या विषयी जाणू या : दिपाली तिच्या कुटुंबात सर्वात मोठी आहे. तिचे वडील भाजीपाला विकतात. ते भाजीपाल्याच्या बाजारात जाण्यासाठी सकाळी लवकरच निघून जातात. तिची आई काही घरांची भांडी धूते. ती पण सकाळी लवकर कामावर निघून जाते. दिपाली तिच्या भाऊ आणि बहिणींसाठी जेवन बनविते. ती घर स्वच्छ करते आणि भांडी पण स्वच्छ करते. तिला रेडिओ ऐकणे खूपच आवडते. ती काम करता करता गाणे ऐकते. काम केल्यानंतर ती तिच्या भावाला वडिलांजवळ पोहचवायला जाते, नंतर ती तिच्या लहान बहिणी सुमन आणि शैलाला शाळेत घेऊन जाते.



दिपाली तिच्या आईला कामात मदत करते. दुपारी, ती तिच्या भाऊ आणि बहिणींना घरी परत आणते. संध्याकाळी ती शेजारच्या इतर बालकांसोबत खेळते. तिची आई संध्याकाळी उशिरा घरी येते. दिपाली तिच्या आईला संध्याकाळचे जेवन बनविण्यास मदत करते. तिचे वडील रात्री खूपच उशिरा येतात.

रात्री दिपालीला अंथरूणात झोपून तिच्या बहिणीचे शाळेचे पुस्तक वाचण्याचे आवडते. ती इयत्ता ३ री पर्यंतच शिकली आहे. तीन वर्षापूर्वी जेंव्हा तिच्या लहान भावाचा जन्म

झाला म्हणून त्याचा सांभाळ करण्यासाठी दिपालीला घरी रहावे लागले. या कारणाने ती जास्त शिकू शकली नाही. तिला वाटते की, पुस्तके वाचल्याने तिला माहिती मिळेल. आता, ती पुन्हा शाळेत दाखल झाली आहे आणि नियमित शाळेत जाते.

## आठवण करा आणि लिहा :

❋ दिपाली तिच्या स्वत:च्या घरात कोण–कोणती कामे करते?

____________ ____________ ____________

____________ ____________ ____________

❋ तुम्ही पण घरात काम करतात का? जर हो, तर कोण कोणती ते खाली लिहा :

____________ ____________ ____________

____________ ____________ ____________

❋ घरच्या कामाशिवाय इतर कोणती कामे तुम्ही करतात? जर हो तर सांगा.

____________ ____________ ____________

____________ ____________ ____________

खाली विविध क्रिया दिलेल्या आहेत. दिवसाच्या कोणत्या वेळी तुम्ही कोणत्या क्रिया करतात ते घड्याळामध्ये नोंदा.




सकाळी उठणे




शाळेत जाणे




शाळेतून परत येणे




घरी अभ्यासाला बसणे




खेळायला जाणे




रात्री झोपून जाणे

❋ तुमच्या घरातील कोणते सदस्य घरची कामे करतात? ते कोणती कामे करतात?

| **कुटुंबाचे सदस्य** | **त्यांची कामे** |
|---|---|
| ______________ | ______________ |
| ______________ | ______________ |
| ______________ | ______________ |
| ______________ | ______________ |
| ______________ | ______________ |

चर्चा द्वारे वेग-वेगळे काम त्याचे निश्चित महत्त्व असते. कोणतेही काम चांगले किंवा खराब नसते. जेंव्हा घरात कुटुंबाच्या सदस्यांच्या कामा विषयी चर्चा करतात तेंव्हा लिंगभेद नसला पाहिजे. त्याविषयी बालकांसोबत चर्चा करा.

❇ तुमच्या कुटुंबातील कोणते सदस्य पैसे कमविण्याचे काम करतात?

| कुटुंबाचे सदस्य | त्यांची कामे |
|---|---|
| ______________ | ______________ |
| ______________ | ______________ |
| ______________ | ______________ |
| ______________ | ______________ |
| ______________ | ______________ |

तुमच्या कुटुंबातील कोणते सदस्य काम करतात? परंतु त्यांना त्याचा पैसा मिळत नाही.

तुमच्या आजी-आजोबांकडून माहिती मिळवा, ते जेंव्हा बालक होते, तेंव्हा कोणती कामे करीत होते?

सरला तिच्या आजीला हाच प्रश्न विचारते. आजीने उत्तर दिले, 'जेंव्हा मी लहान होती तेंव्हा मी माझ्या पालकांना लाकडे गोळा करण्यास, गोवऱ्या बनविण्यास आणि शेणाने भिंती लिंपण्यासाठी मदत करत होती. आता आपल्या जवळ शेगडी आहे, जी गॅसवर चालते. आपल्या घराच्या भिंती आणि छत सिमेन्टचे आहे. सरलाच्या आजीने लहानपणी जे काम केले, असे कोणतेही काम सरलाला करण्याचे आवश्यक नाही.



❇ तुम्ही आणि तुमच्या पालकांनी लहानपणी केलेल्या कामाविषयी लिहिले त्यात फरक आहे का ?



❇ दिपालीला घरातील काम करण्यासाठी शाळेत जाण्याचे सोडावे लागले. तुमच्या शेजारी पांच वर्षा पेक्षा जास्त वयाचे बालक जो शाळेत जात नाही, ते शोधून काढा.

❇ त्या बालकाला कशी शाळा आवडेल त्या विषयी लिहा.

प्रथम बालकाचे नाव

शाळेत न जाण्याचे कारण

शाळेत काय आवडते त्याची माहिती

दुसऱ्या बालकाचे नाव

शाळेत न जाण्याचे कारण

शाळेत काय आवडेल त्याची माहिती

**लिहा :**

❇ या बालकाला शाळेत येते करण्यासाठी तुम्ही काय कराल ?

---

शाळेत न गेलेले बालक नसेल, तर या वेळेस गैरहजर बालकाची मुलाकत घेण्यासाठी मार्गदर्शन द्यावे.

# १३ आपल्या भावनांची भागिदारी !

मी सीमा, मी इयत्ता तिसरी मध्ये शिकते. मला शाळेतून घरी आल्यावर, घरातील दोन व्यक्ति सोबत गोष्टी करायला आवडते. त्यांना माझ्या गप्पांमध्ये मजा वाटते.

पहिली व्यक्ति माझी आजी आहे. ती कायम मला ऐकण्यासाठी उत्सुक असते. मी शाळेतून येण्याची ती वाट पाहत असते. ती वृद्ध आहे. कायम तिला पाठीत दुखते. माझी आजी व्यवस्थित पाहू किंवा ऐकू शकत नाही. रोज सकाळी माझे वडिल तिला मोठ्याने बातम्या वाचून ऐकवतात. ती बाकीचे सगळे काम स्वत: करते. जर तिला कोणी मदत करण्याचा प्रयत्न केला तर आजी नाराज होते. भाजीपाला निवडणे आजीला आवडते. ती म्हणते : ''आजकालची मुले समजतच नाही, की भाजीपाला कशा रितीने साफ करायचा ?''



मला गप्पा करायला आवडते अशी दुसरी व्यक्ति रवि आहे. ते आमच्या सोबत राहतात. मी त्यांना रविभाई म्हणते. ते माझ्या आई-वडिलांना भाऊ-वहिणी म्हणतात. मला आमच्या संबंधाची माहिती नाही. परंतु ते खूप प्रमेळ आहे. ते कायम माझ्या प्रश्नांची उत्तरे, देण्यास तयार असतात. 'मी नंतर सांगेल' असे मला कधीही सांगत नाही.

रविभाई कॉलेजमध्ये शिकवितात कॉलेजचे विद्यार्थी त्यांना खूपच मान देतात. रविभाईला संगीत ऐकणे खूपच पसंद आहे. ते नाटकात पण भाग घेतात. त्यांना त्यांच्या मित्रांसोबत गप्पा करायला आणि त्यांच्या सोबत बाहेर जायला खूप आवडते. ते खूप खेळकर आहे. आम्हा सर्वांना खूप हसवतात.



## विचार करा आणि सांगा :

- तुमच्या घरात कोण-कोण आहे ?
- घरातील प्रत्येक सदस्याची विशेषता सांगा.

## सीमाच्या भावाची गोष्ट :

माझा भाऊ जेंव्हा बाहेर जातो तेंव्हा पांढरी काठी सोबत ठेवतो. त्याला घरात फिरतांना पाहून, कोणी सांगू शकत नाही की तो पाहू शकत नाही. त्याला त्याची सर्व कामे स्वतःच करायला आवडतात जर कोणी त्यांच्या इच्छे विरुद्ध त्यांची मदत केली तर त्यांला आवडत नाही. जेव्हा पण त्याला मदत हवी असते, तेंव्हा तो मदतीसाठी सांगतो.

भावाचे काही विद्यार्थी त्यांच्या जवळून पुस्तके घेऊन जातात. या पुस्तकाला वाचून आवाज रेकॉर्ड करून भावाला देऊन जातात. रविभाई ते ऐकतात. भावाजवळ इतर खूप पुस्तके आहेत. ह्या पुस्तकांची पाने जाड आणि त्यात वर उपसलेल्या टिपक्यांची रांग आहे. ते उपसलेल्या टिपक्यांवर बोटे फिरवून वाचतात.

पुष्कळवेळा भावासोबत मस्करी करण्यासाठी, मी त्यांची काठी ठेवण्याची जागा बदलते. ते अस्वस्थ होतात, परंतु राग करत नाही. कारण, मी त्यांची लहान बहिण आहे.

मी अजून घरात पोहचेल, तेवढ्यात भाऊ बोलले : "सीमा, आज तू खूपच खुश दिसते आहे!"

भाऊ फक्त मलाच नाही, परंतु कुटुंबातील सर्वच सदस्यांना त्यांच्या हालचालीच्या आवाजावरून ओळखून घेतात. ते हलनचलन आणि आवाजाने हे पण सागूं शकतात की घरात कोण आनंदीत आहे आणि कोण दु:खी आहेत.

मी भाऊला म्हणाली : "भाऊ शेवटी, माझी फूटबॉलच्या टीममध्ये निवड झाली आहे." त्यांनी मला शाबासकी दिली आणि प्रेमाने म्हणाले : "आजापासून तू मला, फूटबॉलचे प्रशिक्षण देणारी कोच आहे."

## विचार करा आणि लिहा :

- सीमाचे वडील आजीसाठी वर्तमापत्र मोठ्याने वाचतात. तुम्ही म्हाताऱ्या माणसांची मदत कशा रितीने करतात?

  ______________________________

- म्हातारपणी लोकांना कशा प्रकारच्या अडचणी येतात?

  ______________________________

बालके गोष्टीत रूची दाखवतात. या गोष्टीच्या पात्रांच्या चर्चेने बालकांना सर्वच माहिती देता येईल.

❋ रविभाऊ अनेक वस्तू पाहिल्या शिवाय कशा रितीने जाणू शकतात?

❋ तुम्हाला कधी काठीची गरज पडली आहे का? केंव्हा?

❋ तुम्ही कधी विचार केला आहे की तुम्हाला काठीची गरज केंव्हा-केंव्हा पडू शकते?

❋ जे लोक पाहू शकत नाही, त्यांना आपण कशा रितीने मदत करू शकतो?

## आठवण करा आणि सांगा :

तुमच्या कुटुंबाच्या सदस्यामध्ये असे कोणी व्यक्ति आहे की जे ऐकू, बोलू किंवा पाहू शकत नाही? अशा एखाद्या व्यक्तिला तुम्ही जाणतात का? त्यांना त्यांच्या कामात इतर लोक कशा रितीने मदत करतात?

तुम्ही गोष्टीत वाचले की रविभाऊ पाहू शकत नाही, परंतु ते त्यांची सर्वच कामे स्वतः करतात. ते वेगळ्या प्रकारच्या पुस्तकांनी शिकतात. ते कशारितीने त्यांचे काम करू शकतात, ते समजण्यासाठी तुमचे डोळे बंद करा. आणि हा खेळ खेळा.

## डोळ्यांवर पट्टी :

गटात एखाद्या बालकाला डोळ्यांवर पट्टी बांधा. एकानंतर एक इतर बालके त्याच्या समोर शांतीने येतील. डोळ्यांवर पट्टी बांधलेल्या बालकाने दुसऱ्या बालकांना स्पर्श करून हे कोण आहेत ते सांगायचे आहे. कोणताही आवाज होणार नाही याकडे लक्ष द्यावे.

याच रितीने दुसऱ्या बालकांना पण एकानंतर एक, डोळ्यांवर पट्टी बांधावी. प्रत्येक बालकाने स्पर्श करून दुसरे बालक कोण आहे त्याचे अनुमान करावयाचे आहे.

आपण दुसऱ्याच्या अडचणी आपल्या स्वतःला त्यांच्या जागेवर ठेवून चांगल्या प्रकारे समजू शकतो.



## चर्चा करा आणि सांगा :

- किती बालके दुसऱ्या बालकांना स्पर्शाद्वारे ओळखू शकतात?
- किती बालके दुसऱ्या बालकांना फक्त ऐकून ओळखू शकतात?
- समोरच्या व्यक्तिला ओळखण्यासाठी तुम्हाला या दोघांपैकी काय सोपे वाटते?



## विचार करा आणि सांगा :

- तुमच्या तोंडात किती दांत आहेत?
- वर्गात कोणत्या मुलाला सर्वात जास्त दांत आहेत?
- तुम्ही फक्त स्पर्शाद्वारे किती वस्तूंना ओळखू शकता?
- कोणत्या माणसांना तुम्ही त्यांच्या चालण्याच्या आवाजावरून ओळखू शकता?
- तुम्ही सुगंधाद्वारे एखादी व्यक्ति तुमच्या जवळ आहे, हे अनुमान करू शकता का?
- तुमचे डोळे बंद करा आणि ऐका तुम्हाला कोणता आवाज ऐकू येतो?

जे लोक पाहू शकत नाही, त्यांच्यासाठी वाचण्याची आणि लिहिण्याची एक विशेष रीत आहे. त्याला '**ब्रेईल लिपी**' असे म्हणतात. ते जाड पेपरवर उपसलेल्या ठिपक्यांच्या ओळीने (रांगेने) लिहिलेली असते. ब्रेईल लिपी उपसलेल्या ठिपक्यांवर बोटे फिरवून वाचण्यात येते.



**एवढे करा :** पाहिल्या शिवाय आकार ओळखणे कठिण आहे की सरळ आहे?

एक काचपेपर घ्या. त्यावर जाड लोकर किंवा जाड दोरा दाबून आकार बनवा. या आकारावर मित्राला डोळे बंद करून, कागदावर हात फिरवायला सांगा. या रितीने आकाराची ओळख सरळ आहे की कठीण? तुमच्या मित्राला विचारा.

- तुमच्या मित्राला या रितीने कागदावर आकार बनवायला सांगा. आता तुम्ही तुमच्या बोटांनी ते ओळखा.


कागदाचा जाड तुकडा घ्या. त्यावर सुई किंवा पेन्सिलच्या मदतीने रेषा ओढा. रेषेवर लहान अंतरावर बिंदू बनवा. तुम्ही पाहू शकता की, कागदामागील बाजू उपसून येईल. आता, तुमच्या मित्राला डोळे बंद करून आणि त्यावर बोटे फिरवून तुम्ही कोणता आकार बनविला आहे ते ओळखायला सांगा.

या रितीने आकाराची ओळख सरळ आहे का?

विचार करा, जे लोक पाहू शकत नाही, ते कशारितीने वाचू शकत असतील?

## चला, ब्रेईल लिपी विषयी जाणू या :

तुम्ही पाहिले की, रविभाऊ विशेष प्रकारची पुस्तके वाचतात. ही पुस्तके कशाप्रकारे बनतात? या पुस्तकांचा सर्वप्रथम विचार कोणी केला? आपण त्या विषयी जाणू या.






बोलण्याशिवाय अभिनय किंवा इशाऱ्या द्वारे आपण संवाद करतो.

वर्गात बोलल्या शिवाय गोष्ट करण्याच्या प्रवृत्तीचे आयोजन करावे.

लुईस ब्रेईल फ्रान्सचा होता. ते जेंव्हा तीन वर्षाचे होते तेंव्हा ते त्यांच्या वडिलांच्या औजारा सोबत खेळ खेळत होते. अचानक, एक अणीदार साधन त्यांच्या डोळ्याला लागले. त्यात त्यांनी डोळे गमावले. लुईझ ब्रेईलला शिकण्यात खूपच रूची होती. दिसत नव्हते तरी सुद्धा त्यांनी हार मानली नाही. ते वाचण्या आणि लिहिण्यासाठी वेग-वेगळ्या रितीने विचार करू लागले. त्यांना जाणवले की स्पर्श आणि अनुभवाने वाचू शकतो. शेवटी त्यांना रस्ता सापडला. वाचण्या, लिहिण्याच्या या रितीला ब्रेईल लिपी म्हणून ओळखतात.

या प्रकारच्या लिपीमध्ये जाड कागदावर उपसलेल्या ठिपक्यांची रांग बनविण्यात येते. त्यावर बोट फिरवून वाचू शकतो. ही लिपी सहा ठिपक्यांवर आधारित आहे. ब्रेईल लिपीमध्ये वर्तमान काळात खूप बदल होत आहे. त्यामुळे वाचणे आणि लिहिणे सोपे होईल. ब्रेईल आता कॉम्प्यूटरच्या मदतीने पण लिहिता येते.

जर तुम्ही बालकांना ब्रेईल लिपीमध्ये लिहिलेले साहित्य दाखविले तर ते अधिक चांगल्या रितीने समजू शकतील.

१८

# आपला आहार

**वेणूचे कुटुंब** | **राणीचे कुटुंब**



## पहा आणि सांगा :

दिलेल्या दोन कुटुंबाचे चित्र पहा.

- दोन्ही कुटुंबात लोक कशा प्रकारची कामे करतात?
- तुमचे कुटुंब पण या दोघांमधून कोणत्या एका प्रकारचे आहे का?

जर हो, तर तुमचे कुटुंब कोणासारखे आहे? तुमचे कुटुंब त्यांच्या सारखे कशा रितीने आहे?

---

जात, धर्म किंवा लिंगाच्या भेदभावाशिवाय भावनांना ठेच लागणार नाही या रितीने घरातील सदस्य त्यांचे काम आणि आहारा सारख्या मुद्यांना लक्षता घेऊन चर्चा करावी.

## विचार करा आणि लिहा :

- तुमच्या कुटुंबातील सर्व सदस्य सोबत जेवतात ? जर नाही, तर का ?

- तुम्ही स्वयंपाकात कोण-कोणती मदत करू शकतात ?

- कुटुंबामध्ये स्वयंपाकात कोण मदत करीत नाही ? का ?

## विचार करा आणि लिहा :

- येथे काही काम दाखविलेले आहेत. तुमच्या घरात आणि तुमच्या मित्राच्या घरात ते काम कोण करते ते विचारा. आणि नोंद करा. तुम्ही पण यादी मध्ये इतर कामे टाकू शकतात.

| काम | काम कोण करते | |
|---|---|---|
| | तुमच्या घरात | तुमच्या मित्राच्या घरात |
| स्वयंपाक बनविणे | | |
| बाजारातून वस्तू आणणे | | |
| कचरा काढणे | | |
| भांडी स्वच्छ करणे | | |
| पाणी भरणे | | |
| | | |
| | | |
| | | |

## आपण जे खातो, तो आहार कुठून येतो?

खाली कित्येक व्यंजनांची नावे दिलेली आहेत. इतर काही नावे यादीत लिहा. जी वस्तू रोप, वृक्ष आणि वनस्पतिमधून मिळते, तेथे 🟢 करा. जी वस्तू प्राण्यांमधून मिळते तेथे 🔴 करा.

| | | | |
|---|---|---|---|
| मध ○ | हळद ○ | मासे ○ | ____ ○ |
| मका ○ | दूध ○ | लिंबू ○ | ____ ○ |
| पालक ○ | बटाटा ○ | ओवा ○ | ____ ○ |
| अंडे ○ | मांस ○ | केळ ○ | ____ ○ |
| टोमॅटो ○ | कांदा ○ | ____ ○ | ____ ○ |


## विचार करा आणि लिहा :

तुम्ही जेंव्हा आजारी पडतात तेव्हा वनस्पतिमधून बनविलेली औषधे घेता का? जेंव्हा –

- ईजा होते तेंव्हा
- पोटात दुखते तेंव्हा
- सर्दी आणि पडसे होते तेंव्हा
- दातात दुखते तेंव्हा

बालकांना त्यांच्या जवळच्या पर्यावरणामधून मिळणाऱ्या वनस्पती आणि जे औषधासाठी उपयोगात घेण्यात येतात ते ओळखण्यासाठी मदत करा. हे त्यांच्या औषधीय वनस्पतिचे परंपरागत ज्ञान वाढविण्यात मदत करेल.


प्रत्येक टोपल्यासाठी खरी वस्तू पसंत करा आणि जोडण्यासाठी रेषा काढा.




आहार म्हणून वापरण्यात येणाऱ्या वनस्पतिंचा कित्येक भाग स्वाध्याय मध्ये दिलेले आहेत. चर्चा दरम्यान यादी मध्ये अधिक नावे टाकता येतील.

# मातीची मजा

एक होती शेंदडी
ते बांधा बांधाने धावत होती
तेथे एक कावळा उडत उडत आला.
शेंदडीला पाहून कावळयाला ती
खाण्याचे मन झाले.
कावळा जरा चोच लांब
करुन खायला गेला
तर ती शेंदडी म्हणाली :
''बापू! अशा घाणेरड्या चोचीने
मला खाऊ शकणार नाही
कुठूणही पाणी आणून चोच धूवून आणा.''
कावळा तर चोच धुवायला विहिरीजवळ गेला. जाऊन विहिरीला म्हणाला :



**''विहीर, विहीर, विहीर देवा !**
**अंगणात आले कावळे देवा**
**द्या पाणी**
**धुवेल चोच,**
**खाईल शेंदडी**
**कूर कूर लागते.''**

विहीर म्हणाली : ''पाणी पाहिजे असेल तर कुंभाराकडून मडके घेऊन ये आणि पाणी भरून घे.''

कावळा तर उडत उडत कुंभार वाड्यावर गेला. जाऊन कुंभाराला म्हणाला :



"कुंभार, कुंभार, कुंभार देवा !
अंगणात आले कावळे देवा.
द्या मडके
काढेल पाणी
धूवेल चोच,
खाईल शेंदडी
कूर कूर लागते."



कुंभार सांगतो : "माती आण तर सुंदर मडके घड्वून देतो."

म्हणून कावळा गेला टेकडी जवळ. जाऊन टेकडीला म्हणाला :

"टेकडी टेकडी टेकडी देवा !
अंगणात आले कावळे देवा.
द्या माती
देईल कुंभाराला,
घडेल मडके
काढेल पाणी
धूवेल चोच
खाईल शेंदडी
कूर कूर लागते."



टेकडी सांगतो "हरणाचे शिंग आणून खोदून घे, नाही कोण सांगते ?"



कावळा तर उडत उडत गेला हरणाजवळ

हरणाला म्हणाला :

"हरण, हरण हरण देवा!
अंगणात आले कावळे देवा.
द्या शिंग,
खोदेल माती,
देईल कुंभाराला,
घडेल मडके,
काढेल पाणी
धूवेल चोच,
खाईल शेंदडी
कूर कूर लागते."



हरण म्हणाले : "मला घाबरवूण माझे शिंग घे; कुत्र्याला बोलवून आण म्हणजे तो मला घाबरवेल."

कावळे दादा तर कुत्र्याजवळ गेला, आणि म्हणाला:

"कुत्रा, कुत्रा, कुत्रा देवा !
अंगणात आले कावळे देवा.
घाबरवूण हरणाला,
घेईल शिंग
खोदेल माती,
देईल कुंभाराला,
घडेल मडके,
काढेल पाणी,
धूवेल चोच,
खाईल शेंदडी
कूर कूर लागते."




कुत्रा म्हणाला : "भाऊ! मी फार उपाशी आहे. म्हणून गायीचे दूध आणून दे तर दूध पिऊन हरण घाबरवायला जातो."

कावळा गाईजवळ गेला जाऊन म्हणाला:

---

बालके गोष्टीच्या रचनेने घटनाक्रमाला समजेल आणि समजून घेतील. त्यांना सर्जनात्मक अभिव्यक्तिची संधी द्या. आणि त्यांना प्रवृत्ती त्यांच्या हाताने करण्यासाठी प्रोत्साहीत करा.

**''गाय, गाय, गाय देवा!**
**अंगणात आले कावळे देवा**
**द्या दूध,**
**पाजेल कुत्र्याला**
**घाबरवेल हरणाला,**
**घेईल शिंग,**
**खोदेल माती,**
**देईल कुंभाराला,**
**घडेल मडके,**
**काढेल पाणी,**
**धूवेल चोच,**
**खाईल शेंदडी,**
**कूर कूर लागते.''**

गाय म्हणाली : ''मी फार उपाशी आहे, मला चांगला दाणचारा खाऊ घालून दूध काढून घे.''

नंतर कावळा सीमेवर दाणचारा घ्यायला गेला. जाऊन सीमेला म्हणाला :

**''सीमा, सीमा सीमा देवी!**
**अंगणात आले कावळे देवा**
**द्या दाणचारा**
**देईल गाईला,**
**काढेल दूध**
**पाजेल कुत्र्याला**
**घाबरवेल हरणाला,**
**घेईल शिंग,**
**खोदेल माती,**
**देईल कुंभाराला,**
**घडेल मडके,**
**काढेल पाणी,**
**धूवेल चोच**
**खाईल शेंदडी**
**कूर कूर लागते.''**

सीमा म्हणाली : ''भाऊ लोहाराकडून विळा घेऊन ये आणि दाण-चारा कापून घे कावळा तर लोहाराजवळ गेला, जाऊन लोहाराला म्हणला:''

**''लोहार, लोहार लोहार देवा!**
**अंगणात आला कावळे देवा.**
**द्या विळा**
**कापेल चारा,**
**देईल गायीला,**
**काढेल दूध,**
**पाजेल कुत्र्याला,**
**घाबरवेल हरणाला,**
**घेईल शिंग,**
**खोदेल माती,**
**देईल कुंभाराला,**
**घडेल मडके,**
**काढेल पाणी,**
**धूवेल चोंच,**
**खाईल शेंदडी,**
**कूर कूर लागते''**

लोहार म्हणाला : ''घे हा विळा''

कावळा विळा घेऊन सीमेजवळ गेला तेथून चारा घेऊन गायीला खाऊ घातले आणि नंतर दूध घेऊन कुत्र्याला पाजले; कुत्रा हरणाला घाबरवायला धावला म्हणून त्याने शिंग देवून टाकले; कावळ्याने शिंग घेऊन टेकडी जवळून माती घेतली आणि कुंभाराजवळून मडके घेतले, नंतर विहिरीमधून पाणी काढून स्वत:ची चोच धुवून शेंदडी खाल्ली.

## विचार करा आणि लिहा :

❋ कावळ्याला मडके कशासाठी पाहिजे होते ?

❋ कावळ्याला मडके बनविण्यासाठी कोणी-कोणी मदत केली ?


❋ कुंभाराला मडके बनविण्यासाठी कोण-कोणत्या वस्तूंची गरज पडली ?

❋ तुमच्या घरी मातीपासून बनविलेले भांडी आहेत ? कोण कोणती आहेत ?


तुम्हाला जर कोणी माती दिली तर तुम्ही मातीपासून भांडी बनवू शकाल का ?

## मातीची वाटी :

माती ओली करा. त्यातून मोठा पींड बनवा. तुमच्या अंगठयाचा उपयोग करून पींडाला मध्यभागी दाबून खड्डा बनवा. आता ते वाटी सारखे दिसेल. त्याला सुकू द्या. नंतर त्याला सजवा. तुम्हाला ज्या वस्तू आवडत असतील त्या वाटीत ठेवा.



## ❋ मातीपासून कटोरा :




मातीमध्ये पाणी टाकून गोळा बनवा. पाण्यासोबत मिसळलेली थोडी माती बाजूला ठेवा. ते दोन मसळलेल्या मातीला जोडण्यासाठी डिंका सारखे काम करेल.

थोडी मसळलेली माती घ्या आणि पोळी सारखी पातळ लाटा. ते कटोऱ्याचे तळ होईल. बाकी उरलेल्या मातीचा भाग सापासारखा वणा. चित्रात दाखविल्या प्रमाणे कटोरे बनविण्यासाठी या मातीच्या बनविलेल्या सापाला तळा सोबत चिकटवा.



## विचार करा आणि सांगा :

### ❋ मातीचे मडके



- ❋ तुम्ही ह्या मडक्यात पूर्ण रात्र पाणी भरून ठेवले तर काय होईल?
- ❋ आपण शाळेत आणि घरी मातीच्या मडक्यात पाणी ठेवतो. हे मडके पाण्याने का खराब होत नाही?
- ❋ तुम्ही विटांना किंवा मडक्याला भट्टीत भाजतांना पाहिले आहे का?

---

जेंव्हा मातीपासून मडके बनवितात तेंव्हा बालकांचे कपडे खराब होतील, परंतु त्यांना प्रवृत्तीद्वारे शिकण्यात मजा येईल.

* पूर्वी मडके नव्हते, तेंव्हा पाणी भरण्यासाठी सर्व काय करत असतील?





## विचार करा आणि लिहा :

* दुनियेमधून सर्व मडके गायब झाले तर...

## तुम्हाला माहीत आहे काय?

फार पूर्वी अशी वेळ होती जेंव्हा लोंकाजवळ मडके नव्हते. त्यांनी अन्न शिजवण्याचे आणि संग्रह करण्याचे सुरू केले. खूप प्रयत्न आणि विचारांनंतर लोक मडके बनविण्यास शिकले. सुरूवातीला मडके दगड आणि मातीमधून बनविले होते. लोकांनी दगडामधून मडके खोदकाम करून आणि दगडाला हाताने कोरून बनविले. त्यांनी मातीचे मडके, माती ओली करून त्याच्या पिंडाला हाताने आकार देऊन बनविला. लोकांनी असे पण शोधून काढले की, मातीच्या मडक्याला पक्के बनविण्यासाठी आगीत शेकता येते.

# १५ माझे घर

माझे नाव नसीम आहे. मी श्रीनगरमध्ये राहतो. उद्या आमच्या शाळेत अनेक प्रवृत्तींचे आयोजन करण्यात आले आहे. ते एक आठवडा चालणार आहे. आमच्या शाळेत कॅम्प आहे म्हणून असे आयोजन आहे. बालके इतर ठिकाणाहून पण कॅम्प साठी इथे आले आहे. सगळ्यांना राहण्यासाठी मैदानात तंबू बांधले आहेत.



आम्ही शाळा खूपच सुंदर रितीने सजविली आहे. कित्येक बालकांनी कपड्याच्या तुकड्यांमधून दाराचे तोरण बनविले. अनेकांनी बदामाच्या सालीचा उपयोग करून सुशोभन केले. कित्येकांनी सुके पान आणि लाकडाच्या भूशाचा उपयोग करून रांगोळी बनविली.

घरांची विविधता दाखविण्यासाठी उदाहरणांमध्ये आसाम, राजस्थान, दिल्ली आणि पर्वतीय प्रदेशांचा उपयोग झाला आहे. बालके घरांची रचना, घरे कशी हवामानाला अनुरूप बांधण्यात आली आहेत, त्याच्याशी परिचित असतील तर चांगल्या प्रकारे समजू शकतील.

आज कॅम्पचा प्रथम दिवस आहे. आम्ही सर्व खूप आनंदीत आहोत. सकाळी आम्ही सर्व एकत्र मिळून मैदानात वर्तुळ बनवून बसलो होतो. प्रत्येकाला स्वत:चा परिचय द्यायचा होता. स्वत: कुठून आले आणि स्वत:ला काय आवडते. त्याची गोष्टी करायची होती. सर्व बालकांनी त्यांच्या कुटुंबाचे व घराचे फोटो आणले होते. प्रत्येकाने स्वत:च्या घरा विषयी गोष्ट केली. भुपेनच्या गटाचा पहिलाच नंबर होता.



## चर्चा :

**भुपेनने स्वत:चा परिचय दिला आणि म्हणाला :**

बांबू किंवा लाकडाच्या घरात राहणाऱ्याने काय लक्ष दिले पाहिजे?




❋ भुपेन जेथे राहतो, तेथे घर बांबूच्या दांडीवर (खांबावर) का बनविण्यात येते?

______________________________

______________________________

❋ भुपेनच्या गावातील घराचे छत कसे होते ? ते असे का बनविण्यात येते ?

❋ या घरात प्रवेश करण्यासाठी काय करावे लागते ?



## चर्चा :

❋ भुपेनच्या घरी रात्री शिडी का काढून घेण्यात येत असते ?

❋ दगडाचे घर बनविण्यासाठी काय समस्या येते ?

**आता, चमेलीचा नंबर आला. ती म्हणाली :**



❋ चमेलीचे घर कोणत्या विस्तारात आहे?

❋ चमेली आणि भुपेनच्या घराच्या छतामध्ये काय समानता आहे?

❋ या विस्तारात छत कशा रितीने उपयोगी आहे?

**चर्चा :**

❋ पक्क्या घरात राहिल्याने कोण-कोणते लाभ होतात?

**मिताली आणि अनुजने सांगितले :**

मिताली आणि अनुज राजकोटहून आले आहेत. त्यांनी सगळ्यांना राजकोटची चित्रे दाखविली. एका चित्रात उंच बिल्डींगा पाहिल्या, भुपेन म्हणाला : 'ओह! इतकी उंच घरे, तुम्ही लोक कशा रितीने चढतात?'



हे घर पहा आणि शोधा की तुमच्या विस्तारातील घरांसारखी घर आहे का?


बहुमाळी घरांमध्ये वरती जाण्यासाठी काय व्यवस्था असेल ?

नवी दिल्ली ही भारताची राजधानी आहे. शहरे आणि गावांमधून लोक दिल्ली सारख्या मोठ्या शहरांमध्ये कामाच्या शोधात येतात. हे लोक शहरां मध्ये स्थायीक होतात. येथे, खूप लोक फार छोट्या जागेत राहतात. पुष्कळ लोकांजवळ घरच नसते. ते झोपडपट्टीत राहतात, कित्येंकाजवळ घर पण नसते. अशी माणसे जेथे जागा सापडते तेथे झोपून जातात – रोडवर, फूटपाथवर, स्टेशनवर...

## चर्चा :

❇ मातीच्या घरात राहणाऱ्याला काय-काय काळजी घ्यावी लागते ?


**काशीरामने सगळ्यांना सांगितले :**





घराशिवायच्या माणसांच्या अडचणीची चर्चा बालके करीत असतील, तेंव्हा ती चर्चा खूपच संवेदनशीलतेने होईल हे खूप महत्त्वाचे आहे.

त्याचप्रमाणे, सर्व गटांनी स्वत:च्या घरां विषयी सांगितले. परिचयानंतर सांस्कृतिक कार्यक्रम सुरू झाला. बालकांनी वेग-वेगळे नृत्य प्रस्तुत केले. प्रत्येकाला बदाम आणि इलायची सोबत काश्मीरचे पेय 'काहवा' दिले. आम्ही खूपच मजा केली.

सायंकाळी आम्ही दाल-सरोवरला गेलो. आम्ही नावेत बनविलेले घर (हाउसबोट) पाहिले. आम्ही शिकाऱ्यामध्ये बसलो आणि त्याला पाण्यामध्ये चालविण्यासाठी कित्येक बालकांनी वल्हे मारले. आम्ही चारी बाजूला निळे निळे पहाड व मध्यभागी चार चिनारी पाहिले.





❋ हाउसबोट इतर घरांपेक्षा कशा रितीने वेगळी आहे?

____________________

____________________

____________________


❋ तुम्हाला अशा घरात रहायला आवडेल का?

____________________

____________________


____________________

## चित्र पहा आणि जोडा :













झोपडी

बर्फाचे घर (ईग्लू)

तंबू

भूंगा
(एक प्रकारची झोपडी)

हाउसबोट

बहुमाळी बिल्डींग

| पाहिलेले घर येथे काढा |
| --- |
| |
| |
| |
| |

❇ तुमचे घर ज्या वस्तूंनी बनलेले असेल त्यावर ✓ करा.

| गवत | शेण | लाकूड | सिमेन्ट | कॅनवास | लोखंड |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

| प्लास्टिक | चून्याचा दगड | बांबू | विटा | काच | दगड |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

तुमच्या शेजारील घरे पहा. ते कशाची बनलेली आहेत? यादी बनवा.

__________ __________ __________ __________

__________ __________ __________ __________

❇ घर बनविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या वस्तूंच्या नमूऱ्याचा संग्रह करा.

## चला, विट बनवू या :


माती गोळा करा. त्यात पाणी टाकून माती मसळा. खाली आगपेटीत भरा आणि दाबा. सुकल्यावर काढून घ्या. तुमची लहान विट तयार होईल.

लहान बनविलेल्या विटला रंग करा. त्यावर तुमचे नाव लिहा. सर्व विटा रंगीत घर बनविण्यासाठी उपयोगात घ्या. ह्या घराच्या छताला सजवा.

- वेगवगळ्या प्रकारच्या घरांच्या चित्रांचा संग्रह करा किंवा काढा एक सुंदर चार्ट बनविण्यासाठी त्याचा उपयोग करा. तुमच्या वर्गखंडात ठेवा.

स्थानिक उपलब्ध वस्तूंचा संग्रह करून बालक घर बनविण्यासाठी कोणत्या वस्तू पाहून त्याविषयी चांगल्या प्रकारे समजू शकेल.

# २७ पत्राचा प्रवास




मी पत्र आहे. मला शामीराने तिचा मित्र सलमानला पेनाने लिहिले आहे. मला टपाल पेटीत टाकण्यात आले. पोस्टमनने मला बाहेर काढले. मला बॅगमध्ये ठेवले. पोस्टमनच्या सायकलीवर प्रवास करुन. मी पोस्ट-ऑफिसात पोहचलो. तेथे मला बॅगमधून बाहेर काढण्यात आले आणि माझ्यावर ठळक शिक्का मारण्यात आला. शिक्का बडोद्याचा होता. तेथून माझा प्रवास सुरू झाला.

माझ्यावर शिक्का लागल्यानंतर मला मोठ्या बॅगेत ठेवले. या बॅगेत दुसरी अनेक पत्र होती, सर्व अहमदाबादची होती. लाल रंगाच्या टपाल विभागाच्या गाडीने मला रेल्वे स्टेशनवर उतरविले. तेथून मला अहमदाबादची ट्रेन मिळाली.

एका दिवसाच्या यात्रे नंतर मी अहमदाबादला पोहचलो. पत्यावर लिहिलेल्या विस्ताराप्रमाणे मला वेगळे करण्यात आले. येथे माझ्यावर दुसरा शिक्का मारण्यात आला. शेवटी पोस्टमनने मला सलमानच्या घरी पोहचविले.

खाली चित्रात पत्राचा प्रवास दिलेला आहे. येथे चित्र क्रमाप्रमाणे नाही. त्यास योग्य क्रमात लावा, संख्येचा नंबर वर्तुळात लिहा.



शामीराने सलमानला पत्र लिहिले. वर्गात तुमच्या मित्राला पत्र लिहा. तुमच्या मित्राचे नाव लिहायला विसरू नका.

प्रत्येकाने पत्र लिहिले, परंतु ते आपण कुठे पोस्ट करावे?

### वर्गासाठी टपालपेटी बनवा :

- एक खाली खोका घ्या.
- त्याला लाल रंग द्या किंवा लाल रंगाचा कागद चिकटवा.
- खोक्याच्या कवरवर कात्रीच्या मदतीने काप द्या. पत्र टाकता येऊ शकेल एवढा काप खोक्यावर असला पाहिजे.

### आता, टपालपेटी तयार आहे!

तुमचे पत्र टपालपेटीत टाका. तुमच्या मित्राने तुम्हाला लिहिलेल्या पत्राची वाट पहा.

एक बालक पोस्टमन बनेल. तो टपालपेटीमधून पत्र घेईल आणि ते सर्व बालकांना वाटेल.

तुम्ही तुमच्या मित्राच्या पत्राला वाचण्याचा आनंद घेतला?

ज्या प्रकारे तुम्ही तुमच्या मित्राला पत्र लिहिले, त्याचरितीने तुमचे मित्र आणि नातेवाईकांनी पण तुम्हाला पत्र लिहिलेच असतील. थोडे पत्र घरून आणा. पहा किती वेगळ्या प्रकारची पत्रे आहेत!



- या पत्रांमध्ये तुम्ही काय वेगळे पाहिले?
- कोण-कोणत्या पत्रांवर तिकीट आहे?
- सर्व तिकीटे एकसारखी आहेत काय? काय वेगळे आहे?
- तुम्ही पत्रावर पोस्ट ऑफिसचा शिक्का पाहिला आहे काय?


---

बालके त्यांच्या मित्रांना लिहिलेल्या पत्राचा समाचार एकमेकांना सांगून आनंद घेतील. त्यांना पत्र लिहिण्यासाठी प्रोत्साहित करा. वेग-वेगळ्या प्रकारच्या पोस्टाच्या तिकीटांचा संग्रह करा. पृष्ठ-११४, वर एक महिला पोस्ट ऑफिसात काम करतांना दाखविली आहे. कुटुंब आणि सामाजिक रितीने चर्चा करून जातिची व्याख्या द्या.


वेग-वेगळ्या प्रकारचे/स्टॅम्प (पोस्टाच्या तिकीटांचा) संग्रह करा आणि खाली लावा.

| | | |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

पोस्ट-ऑफिसमधून मिळत असतील तशा वस्तूंना ओळखा आणि त्याचे नाव लिहा.

| | | |
|---|---|---|
|  |  |  |
| | | |
|   |   |  |
| | | |

खाली दिलेल्या पोस्टकार्डात तुमचा पूर्ण पत्ता लिहा :




## विचार करा आणि लिहा :

शामीराचे पत्र बडोदरा ट्रेनद्वारे पोहचले. जेंव्हा ट्रेन नव्हती तेंव्हा पत्र कशा रितीने पोहचत असतील ? चर्चा करा.

- पोस्ट ऑफिसात काय-काय पहावयास मिळते ?

- पोस्ट कार्ड लिहून विदेशात संदेश पाठवू शकतो का ?

- पोस्ट ऑफिसात इतर कोण-कोणती कामे होतात ?

## पोस्ट ऑफिसची मुलाकात :

जवळील पोस्ट ऑफिसची मुलाकात घ्या. तेथे पत्र कशा रितीने येतात आणि तेथून कशा रितीने जातात ते पहा. दुसरे तेथे कोणते काम होते ?

पूर्वीच्या काळी पत्र कशा रितीने पोहचत होते, ते मुलांना वयस्कर माणसांकडून जाणण्यास सांगा. बालकांना कदाचित पोस्टकार्ड वर पत्ता लिहिण्यासाठी मदतीची गरज पडेल.
म्हातारी माणसे भूतकाळा विषयी जाणण्यासाठी खूपच महत्त्वाचे आहेत ते समजवून बालकांना त्यांच्या सोबत चर्चा करण्यासाठी प्रोत्साहीत करा.

रीना आणि राधा पत्राविषयी काय गप्पा करीत आहेत ?




रीना आणि राधा गावात असलेल्या एका दुकानावर फोन करण्यासाठी गेल्या. राधाने नंबर लावला. दोघींनी त्यांच्या आजी सोबत गोष्ट केली. त्यांनी दुकानदाराला पैसे दिले. खूपच आनंदाने घरी परत आल्या.

## विचार करा आणि लिहा :

- तुम्ही सर्वांनी टेलिफोन किंवा मोबाईल कुठे कुठे पाहिला आहे ?

- टेलिफोन किंवा मोबाईलवर तुम्ही कोणा–कोणासोबत वार्तालाप करतात ?

- तुम्हाला पत्र लिहिणे किंवा फोन करणे, दोघांपैकी काय पसंद आहे ? का ?

अनेक कामात महिला आणि पुरूषांद्वारे टेक्नोलॉजीचा उपयोग होतो. आधुनिक काळात कम्प्यूटर आणि इंटरनेट द्वारे वेगाने पत्र व्यवहार शक्य झाले आहे. या विषयी बालकांसोबत चर्चा करावी.

## चित्र काढा आणि रंग भरा :

❋ टेलिफोन किंवा मोबाईल वेग-वेगळ्या प्रकारचे असतात, तुम्ही पाहिलेल्या टेलिफोन किंवा मोबाईलचे चित्र काढा.

| | | |
|---|---|---|
| | | |

## तुमचा स्वतःचा टेलिफोन बनवा :

**काय पाहिजे ? :** रिकामी आगकाडीच्या दोन पेट्या किंवा आईस्क्रीमचे दोन कप आणि दोरा.

दोन्ही आगकाडी पेट्या किंवा आईस्क्रीमच्या कपाला छिद्र पाडा. दोन्ही छिद्रांमधून दोरा जाऊ द्या. दोऱ्याच्या दोन्ही टोकाला गाठ मारा. तुमचा टेलिफोन तयार आहे. तुमच्या मित्राला टेलिफोनचे एक टोक त्याच्या कानाजवळ ठेवायला सांगा आणि दुसरे टोक तुम्ही तुमच्या तोंडाजवळ ठेवा. लक्षात ठेवा दोरा ताणलेला असावा आणि कुठे अडणार नाही. वार्तालाप चालू करा.

## विचार करा आणि लिहा :

| | टेलिफोन | पत्र |
|---|---|---|
| काय सारखे ? | ______ | ______ |
| काय वेगळे ? | ______ | ______ |

बालकाच्या वातावरणाला लक्षात ठेवून इतर संभाषणाची दुसरी साधने जसे की मोबाईल, ई-मेल, फॅक्स वगैरेची चर्चा करा.

# १८ खेळता-खेळता




सर्व बालके गल्लीत **लंगडी पाटा** खेळ खेळत होते. अवंतिका आणि तिची बहिन नंदिता पण खेळत होती. परंतु नंदिता हा खेळ चांगल्या प्रकारे खेळू शकत नव्हती. तिला या खेळाविषयी माहिती नव्हती.

अवंतिका : नंदिता, मला काळजीपूर्वक ऐक. खेळाला समज, **ठिकरी** (बित्तू) पहिल्या खान्यात टाक. नंतर एका पायावर एक खाणे कुदून दुसऱ्या खान्यात पाय ठेव. लक्षात ठेव जेथे ४-५ आणि ७-८ लिहिले आहे, तेथेच खेळणारा दोन्ही पाय ठेवू शकतो. तुझे पाय आखलेल्या रेषेला अडणार नाही, त्याकडे लक्ष ठेव. जर अडले, तर तू खेळात आऊट होशिल. जेंव्हा तू शेवटच्या खान्याजवळ पोहचशिल तेंव्हा तू मागे फिरा. जेंव्हा तू मागे फिरशिल तेंव्हा ठिकरे उचलून त्याला परत आणावे. एक वेळा या रितीने केल्यानंतर ठिकरे त्याच्या पुढच्या खान्यात टाकावे. याच रितीने, ठिकरे एकानंतर एक खान्यात टाकून खेळ पुढे न्यावा.

या पाठात स्थानिक खेळ जसे की लंगडीपाटाचा खेळ, सात लाईन वगैरे खेळ खेळण्यासाठी वस्तू उपयोगात घेण्यात येते, जसे की ठिकरे दाखविले आहे. अजूनही अनेक खेळांची स्थानिक विविधता आणि स्थानिक बोली प्रमाणे नाव आहे. त्यावरील चर्चेमुळे हा पाठ बालकांना जास्त सुसंगत वाटेल.

बालकांनी पून्हा खेळण्याचे सुरू केले. खूप वेळेपासून काकू त्यांना खेळतांना पाहत होत्या. काकूला पण त्यांच्या सोबत खेळण्याची इच्छा झाली. त्या विचारल्या शिवाय राहू शकल्या नाही. काकू म्हणाल्या : "मी तुमच्या सोबत खेळू शकते?" हे ऐकूण खेळणारी सर्व बालके मोठ्याने हसू लागली.

अवंतिका : काकू तुम्ही खेळाल?

काकू : तू असा विचार का करत आहे, की मी लंगडीपाटा खेळ खेळू शकणार नाही? तुझ्या एवढी वयाची असतांना मी खूप खेळ खेळत होती.

नंदिता : काकू, तुम्ही कोण-कोणते खेळ खेळत होत्या?

काकू : लंगडी, लपाछपी, लगोरी आणि दुसरे अनेक खेळ आम्ही खेळत होतो. कबड्डीमध्ये आमची तुकडी आजूबाजूच्या गावातील तुकडीमध्ये सर्वात चांगली म्हटली जायची.

रजत : काकू, तुम्हाला खेळण्यासाठी इतका वेळ कसा मिळत होता? आम्हाला तर खेळण्यासाठी वेळच नाही.

काकू : नाहीच मिळणार, तुम्ही पूर्ण दिवस टी.वी. पाहण्यातच राहतात.

नंदिता : काकू, काका पण हे सर्व खेळ खेळत असतील?

काकू : ते गोट्या, लगोरी, कुस्ती, कबड्डी, विट्टी-दांडू आणि इतर अनेक खेळ खेळत. जेंव्हा ते पतंग उडवायचे तेव्हा ते जेवायचे पण विसरून जायचे!

नंदिता : काकू, गप्पा मारू नका येथे या. आपण खेळू या.

काकूने मुलां बरोबर खेळण्याचे सुरू केले त्या थोडा वेळ खेळल्या आणि पावसाला सुरूवात झाली.



## विचार करा आणि लिहा :

तुम्ही कोण कोणते खेळ खेळतात?

| | | |
|---|---|---|
| | | |
| | | |



सर्व बालके : अरे रे!

काकू : चला, बालकांनो घरात खेळ खेळू या. सर्व बालके हे ऐकूण संमत झाले.

सर्व बालके : हो चला, काकूच्या घरात खेळायला जाऊ या.

सर्व काकूच्या घरात आले. घरात काका आणि आत्या बुद्धिबळ (चेस) खेळत होते.

अवंतिका : आपण काय खेळू या?

रजत : चला आपण 'घर घर' खेळू या.

सर्व बालके : 'घर घर' खेळण्यास तयार झाले.

रजत : चल आपल्या जवळ बाहुली असेल तर आपण तिच्या सोबत खेळू शकतो.

काकू : तुम्हाला बाहुली पाहिजे का? चला, आपण बाहुली बनवू या.

काकू थोडे जूने कपडे घेऊन आल्या. काकूच्या मदतीने मुलांनी बाहुली बनविली.

काही बालकांना कॅरम आणि काहींना चेसचा खेळ खेळायचा होता. त्यांनी गट बनविला आणि खेळायचे सुरू केले.

## विचार करा आणि लिहा :

खाली दिलेल्या कोष्टकात पाठात दिलेल्या सर्व खेळांची नावे लिहा. जे खेळ घरात खेळले जातात त्यांच्या समोर काढा. जे खेळ घराच्या बाहेर खेळले जातात त्याच्या समोर काढा. खेळ-खेळणाऱ्या खेळाडूंची संख्या लिहायला विसरू नका. जर इतर वस्तू खेळासाठी आवश्यक असतील तर त्यांची नावे लिहा.

| पाठात दर्शविलेले खेळ | / | खेळाडूंची संख्या | लागणारी वस्तू |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

पुष्कळ बालकांना कोष्टक पूर्ण करण्यासाठी मदतीची गरज पडते. मुलांना एकमेकांची मदत करण्यास प्रोत्साहित करा. मुले एक एकमेकांपासून सहज पणे शिकतात.

तुम्ही लंगडी पाटा खेळा सारखा दुसरा कोणता खेळ खेळतात ?

त्या खेळाचे नाव काय आहे ?

खेळाचे चित्र काढा.

## आठवण करा आणि लिहा :

❇ तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या सदस्या सोबत खेळ खेळतात ?

| कुटुंबाचे सदस्य | खेळाचे नाव |
| --- | --- |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

❊ तुमच्या विस्तारातील एखाद्या प्रसिद्ध खेळाडूला ओळखतात का? हो, तर त्यांचे नाव आणि खेळा विषयी लिहा.

❊ चेंडूने खेळू शकाल असे किती खेळ तुम्हाला माहीत आहेत? त्यांची नावे चेंडूत लिहा.

❊ तुम्ही लज्जा गोस्वामी विषयी ऐकले आहे का? ती कोणता खेळ खेळते? खेळ शोधून काढा आणि त्याचे नाव लिहा.

❊ दुसरे कोण-कोणते खेळ तुम्हाला जास्त आवडतात?



## विचारा आणि लिहा :

पालकांना विचारा, जेंव्हा ते बालक होते, तेंव्हा कोणते खेळ खेळत होते?

प्रसिद्ध स्थानिक खेळाडू विषयी माहिती एकत्र करून बालकांमध्ये खेळांविषयी ज्ञानात वाढ व्हावी आणि त्यांच्यात त्या लोकविषयी मान निर्माण व्हावा तशा चर्चेचे आयोजन करा.

## विचार करा आणि सांगा :

कोड्याला चित्रासोबत जोडा. दिलेल्या जागेत खेळाचे नाव लिहा.

काचेचा ए कंचा नानां,
जो जिंकेल तो राहिल ना चूप
जो कुंचाला ताकून जाईल
तो विजेता जाहिर होईल.



जर सापावर तुम्ही आलात,
त्याला तुम्ही घाबरू नका.
खेळात शिडी पण आली,
लगेच पुढे पोहचून जा.

पांढऱ्या-काळ्या पुठ्यावर,
राजा-राणी आणि घोडा आहे
लहान मोठे सैनिक अनेक,
डोक वापरेल तर होईल एक्का

त्याला पंख नाही पण उडू शकतो,
दूर-दूर पर्यंत तो जाऊ शकतो.



राजा, राणी, एक्का आणि गुलाम
सर्व मिळून होतात एकूण बावन्न
चोका आणि छक्याचे रन मिळतात.
रन मिळाले तर शतक बनते.

बालकांनी पाठात दर्शविलेले काही खेळ खेळले असतील, ऐकले असतील, वाचले असतील. किंवा चलचित्रांमध्ये खेळतांना पाहिले असतील. हे सर्व तुमच्या चर्चे मध्ये घेऊ शकतात.


खेळ खेळण्याशिवाय, तुम्हाला दुसरे काय करायला आवडते?

## रंग भरा :

तुमच्या कुटुंबातील सदस्य दुसरे काय काम करतात? तुमच्या कुटुंबातील सदस्य रिकाम्या वेळात काय काम करतात? ते चित्रात रंग भरा. आवश्यक वाटेल त्या ठिकाणी चित्र काढा आणि लिहा.



वाचणे



शिवणकाम आणि भरतकाम करणे



नृत्य करणे



गप्पा मारणे



रोपाची देखभाल करणे



टपाल तिकिट संग्रह करणे

# १९ आपले सोबती

छताच्या पंख्यामधून टक् ... आवाज आला होता. सर्वांनी आवाज ऐकला. कल्याणीने आरोळी मारली : ''पहा, पहा एका पक्ष्याला जखम झाली.'' पिटरने लगेच उभे होऊन, पक्ष्याला पकडले. पक्षी तडफडत होता.



नवज्योत आणि हरभजनने त्वरित वाटीत पाणी आणले. पिटरने खूपच प्रेमाने पक्ष्यावर हात फिरविला. त्यांनी पक्ष्याच्या चोचीपुढे वाटीत पाणी धरले पक्ष्याने थोडे पाणी पिले ते पंख हलवित होते. नवज्योतने सगळ्यांना मागे सरकायला सांगितले. सगळ्यांनी पाहिले, पक्षी उडण्याचा प्रयत्न करीत होता.

थोड्याच वेळात पक्षी उडून गेला...



दुसऱ्या दिवशी शाळेत बालकांनी एका पक्ष्याला वर्गखंडात उडतांना पाहिले. सर्वांना पहायचे होते की, जी जखम झाली होती तोच पक्षी होता की दुसरा. त्यांनी लवकर पंखा बंद केला. पक्ष्याला पाहण्यासाठी ते टाळ्या वाजवू लागले.

## आठवण करा आणि लिहा :

एकमाच्या माहिती आधारे खाली दिलेल्या वाक्यांना योग्य क्रमात लावा :

१. पक्षी उडून गेला. ५

२. पक्ष्याला पंख्यामुळे जखम झाली होती.

३. पिटरने प्रेमाने पक्ष्यावर हात फिरविला.

४. बालकांनी पक्ष्याला वर्गखंडात उडतांना पाहिले.

५. नवज्योत आणि हरभजन यांनी त्वरित वाटीत पाणी आणले.

## शंकरची मांजर :



शंकर खूपच खुश आहे. त्याच्या घराच्या वाड्यात मांजरीने चार पिल्लांना जन्म दिला. शंकर त्याचा रिकामा वेळ त्यांच्या मागे घालवू लागला.

एके दिवशी सकाळी शंकर मांजरीच्या रडण्याच्या आवाजाने उठला. तो वाड्याकडे धावला. त्याने पाहिले मांजर रडत-रडत तीन पिल्लांना गोंजारत होती. एक पिल्लू हरवले होते. शंकर वाड्याच्या बाहेर गेला. त्याची बहीण मालिनी एका पिल्लाला खेळवत होती.

शंकरने मालिनीला वाड्यात बोलवली. मालिनीने पाहिले, मांजर पिल्लासाठीच रडत होती.

## विचार करा आणि सांगा :


- मांजरीचा आवाज कसा असतो ?
- तुम्हाला कोणते प्राणी आवडतात ? का ?

प्राण्यांच्या सहानुभूतीची चर्चा बालकांना त्यांच्या विषयी संवेदनशील बनवेल.

## मीनुची गाय :

मीनुजवळ गाय आहे. गायीचे नाव गंगा. गायीला चरण्यासाठी रोज शेतात घेऊन जाते.

एके दिवशी वेगाने येणाऱ्या स्कूटरने गंगाला टक्कर मारली. तिच्या पायाला जखम झाली. पायांच्या घावेमधून खूपच रक्त निघत होते.





### विचार करा आणि सांगा :

मीनुच्या कुटुंबातील लोक काय करतील?



### पहा आणि लिहा :

- चंदू धोबी त्याच्या गाढवाची फारच काळजी घेतो. गाढवही त्याचे पुष्कळ कामे करतो.

चित्र पहा आणि चंदू त्याच्या गाढवासाठी काय करतो, ते लिहा:









## विचार करा आणि लिहा :

- तुमच्या घरी किंवा शेजारी कुणाच्या घरी पाळीव प्राणी आहे का? कोणता?

- तुमच्या पाळीव प्राण्याचे नाव काय आहे?

- तुम्ही तुमच्या पाळीव प्राण्यासाठी काय करतात? जेंव्हा ते –
  - उपाशी असते
  - कोणी त्याला चिडवले तर
  - इजाग्रस्त झाले तर
  - थंडी किंवा गरमी अनुभवतो

- **आठवण करा आणि लिहा :**


अनेक लोक पाळीव प्राणी पाळतात. त्यांची काळजी पण घेतात. खाली कोष्टकात अशा प्राण्यांची नावे दिली आहेत. खूटणारी माहिती लिहा :

| प्राण्याचे नाव | आपण त्याला का पाळतो ? |
|---|---|
| कुत्रा | |
| | ती दूध देते. |
| | तो गाडे खेचतो. |
| मांजर | |
| कोंबडी | |
| मासे | |
| | आपण त्याला खूपच पसंत करतो. |
| मधमाशी | |

खूप लोक पाळीव प्राणी पाळतात. आणि त्यांची काळजी पण घेतात. विविध प्राण्याचा आहार घेण्याच्या सवयीच्या अवलोकनासोबत सजीव पर्यावरणमध्ये एकमेकांवर निर्भर असतात, ते बालकांना समजवून चर्चा करावी.

## पक्षी पाणपोई ( परब ) :

मोठे तोंड असणारे मातीचे भांडे घ्या. मातीच्या भांड्याला बांधा. चित्रात दाखविल्या प्रमाणे टांगा. भांड्यात थोडे पाणी भरा आणि त्याला झाडाच्या फांदीवर किंवा हुकच्या मदतीने तुमचे घर किंवा शाळेमध्ये टांगा. दररोज त्यात पाणी भरा. कोणता पक्षी पाणी पिण्यासाठी येतो त्याचे अवलोकन करा.



## विचार करा आणि लिहा :

❋ आपल्यासारखे पक्ष्यांना पण जगण्यासाठी पाण्याची गरज आहे. अनेक वस्तू मानवासाठी आणि प्राण्यांना दोघांना आवश्यक आहे. अशा तीन वस्तूंची नावे लिहा :

| क्रम | मानवाला उपयोगी | प्राण्यांना उपयोगी |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |

## विचार करा आणि सांगा :

आपण विविध प्रकारचा आहार खातो. त्याचप्रकारे, प्राणी पण विविध आहार खातात.

बालकांना पक्षी पाणपोई बनविण्यासाठी मदत करा. पक्षी पाणपोईला घराच्या बाहेर किंवा शाळेत सर्व पाहू शकतील त्या रितीने ठेवा. बालके पक्ष्यांचे जवळून अवलोकन करू शकतील आणि त्याविषयी जास्त जाणतील त्यासाठी प्रयत्न करावे.

❇ तुम्ही एखाद्या प्राण्याला खाऊ घातले आहे का?

❇ एखाद्या प्राण्याला खाऊ घालतांना तुम्ही पाहिले आहे का?

| तुम्ही ज्या प्राण्याला खाऊ घातले असेल त्याचे नाव | काय खाऊ घातले ? |
|---|---|
| ● | ● |
| ● | ● |
| ● | ● |
| ● | ● |
| ● | ● |




## विचार करा आणि लिहा :

❇ पक्ष्याला काय खाऊ घालू शकतो?

❇ तुम्ही कोणत्या पक्ष्याला खाऊ घातले?



❇ मुले सर्वात जास्त कोणत्या पक्ष्याला खाऊ घालतात?

❇ तुमच्या जवळ यादीत हे नाव आहेत? शोधा, ते काय खातात?

| | | | | |
|---|---|---|---|---|
| उंदीर | झूरळ | डुक्कर | वटवाघूळ | कावळा |
| खारूताई | माकड | कोळी | पाल | |





## विचार करा आणि लिहा :

❇ एखादा प्राणी किंवा पक्ष्याने तुमचा आहार खाऊन घेतला असेल तर त्या विषयी लिहा.

## समजा आणि जोडा :

कोण काय खाते ? वेगवेगळ्या रंगाची रेषा काढून जोडा.




## आठवण करा आणि लिहा :

प्राण्यांची नावे लिहा :

| तुम्ही हात लावला आहे | तुम्ही हात लावला नाही, पण हात लावू शकतात. | तुम्ही हात लावू शकत नाही. |
|---|---|---|
| ________ | ________ | ________ |
| ________ | ________ | ________ |
| ________ | ________ | ________ |
| ________ | ________ | ________ |

आपण अनेक प्राण्यांच्या जवळ चावणे किंवा नुकसान होण्याच्या भितीने जवळ जात नाहीत. पुष्कळ प्राण्यांना आपण स्पर्श करू शकतो ते आपल्या घरात किंवा आपल्या आसपास राहतात. त्यातील काही प्राणी आपली मदत करतात.

प्राण्याला हात लावणे (स्पर्श करणे), त्याली प्रेमाने गोंजारणे आणि चिडवू नये ती मुलांसोबत चर्चा करू शकतो. दुसऱ्या पृष्ठावर दिलेले चित्र निसर्गांचे संतुलन दाखविते. मुलांना ते साध्या आणि सरळ रितीने वर्गीकृत करून समजविणे जरूरी आहे.

## राणीचा बगीचा

खालील चित्रे वाचा आणि वर्गात चर्चा करा :



# २० किती रे किती ?



## किती रे किती ?

चला, एक खेळ खेळू या. तुम्ही ह्या खेळाशी परिचित आहात. सगळे वर्तुळात उभे रहा.

एक बालक वर्तुळात मध्ये उभा राहिल. आता ताल वाजेल. जो पर्यंत ताल वाजेल तो पर्यंत प्रत्येक बालकांने वर्तुळात पळावे.

जे बालक ताल वाजवित आहे, ते अचानक ताल वाजवायचे बंद करेल. संगीत बंद करून तो मोठ्याने एखादी संख्या बोलेल जसे की दोन, चार किंवा पांच.

जी संख्या बोलली जाईल, तेवढ्या संख्येचा बालक गट बनवतील.

जी बालके कोणत्याही गटात जोडू शकले नसतील ते हा खेळ सोडतील.

खेळात दोन बालके राहतील, तो पर्यंत हा खेळ खेळू शकतो.



## विचार करा आणि सांगा :

### ❊ चला, या खेळा विषयी गोष्ट करू या

- तुम्हाला जेंव्हा जरूरी संख्येच्या गटात जुळण्याचे सांगितले तेंव्हा तुम्ही काय केले ?
- तुम्ही कोणत्याही गटात जोडू शकले नाहीत, तर कसा अनुभव झाला ?
- तुम्ही कोणत्या एकाही गटात का जुळू शकले नाहीत ?
- शाळेत तुम्हाला कोणासोबत जास्त आवडते ? कशामुळे ?
- तुम्हाला कायम ऐकटे रहावे लागले तर कसे वाटेल ?

---

खेळ 'किती रे किती' मध्ये ताल वाजविणे आणि संख्या बोलणे हे कोणीही करू शकते. बालकांच्या संख्येच्या आधारे गटात किती जास्त किंवा कमी संख्या असेल ते बोलू शकतो.

आपण सर्व एकटे राहण्याऐवजी लोकांबरोबर रहाणे पसंत करतो. आपण नेहमी समूहात राहतो. चला, असा एक समूह पाहू या. देवेन्द्र आणि मंजुलाचा परिवार फोटोमध्ये सोबत दिव्या आणि मानव.



हे सर्व लोक एकदुसऱ्यासोबत कशा रितीने जुळलेले असतील?

तुम्ही चित्रात पाहिले तो एकाच परिवाराचा फोटो आहे. आपण पुष्कळवेळा अशा कुटुंबाचे चित्र किंवा फोटो पाहतो. असे फोटो आपण कुठे पाहतो? सगळ्यांच्या कुटुंबात इतकेच सदस्य असतात का? सगळ्यांचे परिवार एकसारखेच असतात का? चला, थोडे परिवार विषयी वाचूया :

**सीता :**

सीता सुरत शहरात राहते. ते त्यांच्या पूर्वजांच्या घरात राहतात. तिचे आजी, आजोबा, लहान काका आणि आत्या खालील भागात राहतात. पहिल्या माळाच्या एका भागात, सीता तिचे आई–वडिल आणि लहाण बहिन गीता सोबत राहते. दुसऱ्या भागात तिचे मोठे काका त्यांची तीन मुले सोबत राहतात. सीताची काकू काही महिन्या आधीच मृत्यू पावल्या होत्या.

पाठ ५ मध्ये कुटुंबाविषयी चर्चा लक्षात घेणे योग्य राहिल. वर्गात बालकांच्या कुटुंबाची विविधता विषयी गोष्ट करुन या पाठाने परिचित करू शकतो.

तिचे मोठे काका आणि काकू छतावरील एका रूममध्ये राहतात. त्यांचे नुकतेच लग्न झाले आहे.

सायंकाळी जेवणा अगोदर सीताची आई सर्व बालकांना शिकविते.

खालच्या मजल्यावर कुटुंबातील सर्व सदस्यांसाठी एकाच स्वयंपाकघरात जेवण बनते. ते सर्व प्रयत्न करतात की, सायंकाळचे जेवण सर्व सोबत जेवतील. सीतेच्या काकांची लहान मुलगी सीतेच्या आईजवळ झोपते. पहाटे सीता तिला शाळेत जाण्यासाठी तयार करते.





## विचार करा आणि सांगा :

- सीतेच्या परिवारात कोण कोण आहेत?
- वेगवेगळ्या सदस्यांच्या परिवारात कसे संबंध आहेत?
- शेवटच्या वर्षात तुमच्या कुटुंब/परिवारमध्ये काय बदल झाला आहे?

## तारा :

तारा तिची आई आणि आजोबा सोबत राजकोट मध्ये राहतात. तिची आई मिनाक्षीने लग्न केले नाही. त्यांनी ताराला दत्तक घेतली आहे. मीनाक्षी सकाळी ऑफिसला जाते आणि संध्याकाळी येते. जेंव्हा तारा शाळेतून येते, तिचे आजोबा तिची देखभाल करतात. आजोबा तिला जेवू घालतात, गृहकार्यात मदत करतात आणि तिच्या सोबत खेळतात.



तुम्हाला बालकांसोबत खूपच सावधान आणि संवेदनशील रहावे लागेल. मादक पदार्थांचे सेवन न करण्याचा सल्ला द्यावा. मादक पदार्थांच्या सेवनाने होणाऱ्या परिणामांची वर्गात चर्चा करा.

सुट्टी मध्ये ते तिन्ही दूर ठिकाणी फिरायला जातात आणि मजा करतात. कधी-कधी ताराची मावशी, मावसा आणि त्यांची मुले पण त्यांच्या घरी येतात. त्यावेळेस ते एकत्र राहून वेळ घालवितात आणि गप्पा-गोष्टी करतात.

### विचार करा आणि सांगा :

- ❊ ताराची देखभाल कोण करते? कशा रितीने?
- ❊ कुटुंबातील सदस्य एकत्र येऊन कशारितीने मजा करतात?



### ❊ रेहाना आणि हबीब :

रेहाना आणि हबीब शहरात राहतात. दोन्ही नोकरी करतात. हबीब सरकारी ऑफिसमध्ये क्लार्क आहे. आणि रेहाना शाळेत शिकविते. हबीबचे वडील निवृत्ती नंतर त्यांच्या सोबत राहतात. संध्याकाळी ते तिन्ही सोबत बसून टेलिव्हिजन पाहतात. त्यांना चर्चा पहाणे पण आवडते. सुट्टीत शेजारील बालके त्यांच्या घरी येतात आणि खूप मजा करतात. ते खेळ खेळतात, बाहेर जातात. आणि कधी नाटक आणि चलचित्र पण पाहतात.

### विचार करा आणि सांगा :

- ❊ या कुटुंबात दुसरे कोण-कोण आहेत?
- ❊ टेलिव्हीजनवर तुम्हाला काय पहायला आवडते? का?
- ❊ कुटुंबातील सदस्य एकत्र येऊन कशा रितीने मजा करतात?

असे पण होते की कित्येक कुटुंबातील सदस्य मादक द्रव्याचे सेवन करीत असतात पण अशा सवयीचे शिकार बालके होणार नाही त्यामधून वाचविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

## केतन :



केतन, त्याचे वडिल, काका आणि चूलत भावांसोबत अहमदाबादच्या कॉलनीमध्ये राहतो. केतन आणि त्याच्या भावांना अहमदाबादला शिकण्यासाठी यावे लागले. त्याचे वडिल आणि काका येथे काम करतात.

सर्व एकत्र मिळून घरकाम करतात. केतनच्या काकाने बनविलेला स्वयंपाक सगळ्यांना आवडतो. केतनचे वडिल बाजारातून खरेदी करून आणतात. ते थोडे पैसे केतनच्या आजोबाला नियमित गावी पाठवितात. केतनची आई, आजी-आजोबा, काकू, लहान-मोठे भाऊ आणि बहिण त्यांच्या गावी राहतात. वर्षातून एकवेळा केतन गावी जातो. त्याची आई गावी राहते. केतन अहमदाबाद मध्ये राहतो.

तो त्याच्या आईची खूप आठवण करतो. तो त्यांना पत्र पण लिहितो.



### विचार करा आणि सांगा :

- केतनच्या कुटुंबातील सदस्य एकमेकांसोबत कशा रितीने संपर्कात राहतात?
- केतनच्या कुटुंबातील कोणते सदस्य शहरात आणि कोणते सदस्य गावी राहतात? का ?

## कृष्णा आणि कावेरी :

कृष्णा आणि कावेरी त्यांच्या वडिलांसोबत राहतात. त्यांची आई दुसऱ्या शहरात राहते. सकाळी तिन्ही सोबत जातात. कृष्णा कावेरीला शाळेत सोडतात, नंतर कॉलेजला जातात. त्यांचे वडिल दिवसा दुकानात जातात.

कावेरी दुपारी शाळेतून येते. ती घर उघडते आणि कृष्णाची वाट पाहते. कॉलेजहून आल्यावर कृष्णा आणि कावेरी सोबत जेवतात.



कावेरी तिच्या शाळेचे गृहकार्य संपवून खेळायला जाते. नंतर आल्यावर ती भावासोबत कॅरम खेळते किंवा टेलिव्हिजन पाहते. जेंव्हा तिचे वडील घरी येतात, तेंव्हा ते जेवनाचे बनवितात आणि सर्व सोबत जेवतात.

सुट्यांमध्ये कावेरी तिच्या आईजवळ रहायला जाते. कृष्णा पण तेथे थोडे दिवस थांबतो, त्याला स्वत:च्या घरी रहायला आवडते. त्याच्या सर्व वस्तू आणि त्याचे वडीलपण येथे राहतात.

## विचार करा आणि सांगा :

- कृष्णा त्याच्या बहिणीची कशा रितीने काळजी घेतो ?
- कृष्णाच्या कुटुंबात कोणत्या प्रवृत्तीमध्ये सगळे जण जोडले जातात ?

तुम्ही कित्येक कुटुंबाविषयी वाचन केले. तुम्ही प्रश्नांची चर्चा पण केली ? कुटुंबाचे प्रकार कोण–कोणते आहेत ? ही माहिती आणि चर्चेच्या आधारे तुम्ही पुष्कळ नक्की करून घेतले असेल.

## विचार करा आणि सांगा :

येथे, दिलेल्या विविध कुटुंबाविषयी चर्चा करा.

---

पाठात दिलेल्या कुटुंबाविषयी थोड्या गोष्टी करा. त्या शिवाय, इतर प्रकारचे कुटुंबपण असतात. ही विविधता समजण्यासाठी बालकांना त्यांच्या कुटुंबाविषयी बोलण्यास सांगा.

तुमच्या कुटुंबात होत असतील अशा वाक्या समोर ✓ करा.

- घरातील सर्व सदस्य काम करतात. ☐
- कुटुंबातील सदस्य एकमेकांवर खूप प्रेम करतात. ☐
- घरातील पालकच काम करून पैसा कमवितात. ☐
- कुटुंबातील सदस्य अधिकांश एकाच घरात सोबत राहतात. ☐
- कुटुंबातील सदस्य अधिकांश एकमेकांना भेटण्यास येत असतात. ☐
- कुटुंबातील सदस्य त्यांच्यामध्ये भांडण झाले तरी सुद्धा सोबतच राहतात. ☐
- कुटुंबात विशेष करून बालके आणि वृद्धांची काळजी घेण्यात येते. ☐

**तुमच्या कुटुंबाविषयी दुसऱ्या गोष्टींचा विचार करा आणि खाली दिलेल्या जागेत लिहा :**

______________________________

______________________________


______________________________

## सीतेचे कुटुंबवृक्ष

तुम्ही कुटुंबाला वृक्षाच्या स्वरूपात पाहू शकतात ? सीतेचे कुटुंबवृक्ष येथे काढलेले आहे :


तुमचे कुटुंबवृक्ष तयार करा. त्यासाठी तुम्ही मोठ्यांची मदत घ्या. सीतेचे कुटुंबवृक्ष पहा. तुमचे कुटुंबवृक्ष बनविण्यासाठी ते उपयोगी होईल.

# सीतेचे कुटुंबवृक्ष




---

# तुमचे कुटुंबवृक्ष



# २१ पाणी वाचवूया


राजस्थानच्या गावाची गोष्ट आहे. गावाचे नाव बाजलपुर. माधो, हा या लहान गावात राहतो. येथे गाव तर नाशिबानेच दिसते. सर्वत्र रेतीच पहावयास मिळते. जेंव्हा रेती उडत नाही तेंव्हा कुठे घर पहावयास मिळते.

उन्हाळयात येथे पाण्याची टंचाई असते. हे वर्ष तर फारच खराब आहे. येथे, पाऊसच पडला नाही. माधोची आई आणि बहिणीला दूर पर्यंत चालून पाणी भरायला जावे लागते. जवळच्या तलावात पाणी सुकले आहे. दररोज चार घडे पाणी भरण्यात तासन् तास जातात. उन्हात गरम रेतीवर चालल्याने त्यांच्या पायाचे पंजे भाजतात. अरे! पायात कधी कधी फोड सुद्धा होतात.



वरील दृश्यात स्त्री जातिची सभानपणे परंपरागत भूमिका (पाणी भरून आणणे) दाखविली आहे. स्त्री पुरूष मधील भेदभाव दूर करण्यासाठी वर्गखंडात या गोष्टीची चर्चा करा.

इथे पाणी पोहचविण्यात येते. गावात पाणी भरलेली ट्रेन येते. त्यावेळी गावात सर्व खूपच खुश होतात. माधोचे वडिल त्यांची उंटगाडी घेऊन पाणी भरण्यासाठी जातात, असे वारंवार होत नाही. लोक पाण्यासाठी अनेक दिवस वाट पाहत असतात.




खूप लोक पावसाच्या पाण्याचा संग्रह करतात. यासाठी खास पद्धतीने एक **टांकी** बनविण्यात येते. असे तुम्हाला माहिती आहे का? टांकी म्हणजे काय? टांकी कशा रितीने बनविली जाते?

टांकी बनविण्यासाठी वाड्यात एक खोल खड्डा खोदण्यात येतो. ही टाकी सिमेन्टने पक्की बनविण्यात येते. टांकीला झाकून ठेवण्यात येते. येथील घरांची छपरे तिरपे ठेवण्यात येतात. त्यामुळे पावसाच्या पाण्याचा संग्रह करता येतो. पावसाचे पाणी पाईप द्वारा टाकीत जाते. पाईपाच्या तोंडाजवळ जाळी लावलेली असते. ज्यामुळे कचरा टाकीत जात नाही. या पाण्याला स्वच्छ करून वापरण्यासाठी घेतात.



## विचार करा आणि सांगा :

पाण्याच्या टंचाईमुळे लोकांना कशा समस्यांचा सामना करावा लागतो?

- माधोच्या घरात पाणी कोण आणते?
- पाणी संग्रह करण्याची कोणती दुसरी पद्धत आहे का?
- टांकीचे पाणी अधिकतर पिण्यासाठी उपयोगात घेतले जाते का?
- तुमच्या घरात पावसाच्या पाण्याचा संग्रह होतो का? जर हो, कशा रितीने?
- माधोच्या गावात लोक पिण्याचे पाणी कुठून भरून आणतात?

जर पाणी संग्रह करण्याच्या वेग-वेगळ्या पद्धतींची बालक एकमेकांशी चर्चा करतील तर ते पाठ्यपुस्तकाच्या माहितीला रोजच्या जीवनासोबत जोडू शकतात.

माधोसारखीच सरोज पण तिच्या घरात पाण्याचा तुटवडा अनुभवते. ती रामनगर मध्ये राहते. दिवसात मात्र अर्ध्या तासासाठीच पाणी देण्यात येते. विस्तारातील सर्वच लोक एकाच नळावरून पाणी भरतात! तुम्ही विचार करू शकतात, की त्यांना काय अडचणी येतात?

### विचार करा आणि लिहा :

❊ पाणी नसेल तर काय अडचणी येतात?

| | |
|---|---|
| ● | ● |
| ● | ● |

सरोजला नळातून पाणी भरायचे असते. जेंव्हा पण तिला संधी मिळते ती स्वत:चा घडा भरते जरी थेंब थेंब पाणी मिळाले तरी.

### मापा आणि लिहा :

❊ किती वेळाने भरेल?



१. एक चमचा किती थेंबानी भरेल?



२. एक वाटी किती चमच्यांनी भरेल?



३. एक मग किती वाट्यांनी भरेल?




४. एक बादली किती मगाने भरेल?

तुम्ही पाहिले, आपल्याला थेंबा थेंबाने किती पाणी मिळते !

## विचार करा आणि लिहा :

❋ विचार करा, थेंब थेंब लीक झाला तर किती पाणी बिघडेल?



## विचार करा आणि लिहा :

❋ पाणी वाचविण्याचे कोण-कोणते मार्ग विचारू शकाल?

तुमच्या सूचना खाली लिहा :

तुम्ही पाणी वाया जातांना पाहिले असेल तशा स्थळांची नावे लिहा.

❋

❋


❋

❋

ज्या ठिकाणी पाण्याची तुटवडा असेल तेथे लोक वेग-वेगळ्या रितीने पाणी वाचविण्याचा आणि पुन्हा वापरण्याच्या पद्धती स्वीकारतात. असे स्वत:ची गरज पूर्ण करण्यासाठी करतात. ह्या समजद्वारे बालके पाणी वाचविण्याचे कित्येक मुद्दे स्वीकारतील तर ते खरोखर जाणू शकतील की, ''पाणी सर्वांसाठी आवश्यक आहे.''

## विचार करा आणि सांगा :

* खाली दिलेले चित्र पहा. चर्चा करा. आपण कोणत्या एखाद्या कामासाठी वापरलेले पाणी इतर दुसऱ्या हेतूसाठी वापरू शकतो का ?



विविध रंगाच्या रेषेने जोडा. कोणते काम केले तर पाणी पुन्हा वापरण्यात घेता येईल ?

| | | |
|---|---|---|
| हात आणि तोंड धुतलेल पाणी | कपडे धुतलेल पाणी | फळे आणि भाजीपाला धुतलेल पाणी |
| पुसण्यासाठी | झाडाला देण्यासाठी | शौचालयात उपयोगात घेण्यासाठी |

तुम्ही पाण्याचा उपयोग करण्याविषयी जाणले आहे. लोक पाणी वाचविण्याची पद्धती तेंव्हाच वापरतात जेंव्हा पाण्याची टंचाई असते. कित्येक लोक पाण्याचा नाश करतात त्यामुळेच पाण्याची टंचाई उभी राहते आहे. विचार करा, जर सगळ्यांना पूरेसे पाणी मिळाले तर किती चांगले !


---

पाण्याचा पुन्हा उपयोग करण्याची चर्चा करा. जे बालकांना पाण्याच्या वाचवण्याचे महत्त्व समजण्यासाठी उपयोगी होईल. या विषयी बालकांचे सूचन ऐकण्यात यावे आणि घेण्यात यावे तर उपयोगी होईल.

# डावे-उजवे

**प्रवृत्ती :**

खाली हाताच्या पंजाचे चित्र दिलेले आहे. त्यावर हाताचा पंजा ठेवा. तळहात कागदाच्या बाजूला राहिल त्या रितीने हात ठेवा. तुमचा अंगठा आणि बोटे चित्रात काढलेला अंगठा आणि बोटांवर ठेवा.



जो हात चित्रात दिलेल्या हातात योग्य बसेल, तो हात तुमचा उजवा हात आहे. तुमचा दुसरा हात नोटबुकच्या कागदावर ठेवा. आणि तुमच्या उजव्या हाताने रेखाचित्र काढा आणि चित्र मिळवा.

**चला आपण गीत गाऊ या.**

उजवा हात वर करा,
डावा हात खाली करा,
दोन्ही हात वर करा.
सोबतच गोलगोल फिरा.
उजवा हात वर करा...
डावा हात वर करा,
उजवा हात खाली करा,
दोन्ही हात खाली करा,
सोबतच उड्या मारा.
उजवा हात वर करा...

**लिहा :**

**डाव्या हाताचे गीत**

याच रितीने, डावा आणि उजवा पंजासाठी गावे :

**पहा आणि सांगा :**


- तुमच्या पुढे काय आहे ?
- तुमच्या डावीकडे काय आहे ?
- कोणत्या वस्तू तुमच्या मागे आहेत ?
- तुम्ही कोणाच्या डाव्या बाजूला बसले आहात ?
- तुमच्या उजव्या बाजूला कोण बसले आहे ?
- तुम्ही कोणाच्या उजव्या बाजूला बसले आहात ?

बालके प्रवृत्ती आणि हावभावा सोबत गीत गाऊन मजा करतील. ते डावे-उजवे, वर-खाली आणि मागे-पुढे विषयी त्यांच्या अनुभवाने ऐकतील.

## वाचा आणि करा :


❇ या चित्रात रूचिरा चित्राच्या मध्यभागी आहे.

- रूचिराच्या मागे पुस्तकाचे चित्र काढा.
- एक फूल रूचिराच्या उजव्या बाजूला काढा.
- खूर्ची रूचिराच्या डाव्या बाजूला काढा.
- रूचिराच्या समोर झाडाचे चित्र काढा.



रूचिराला घरून शाळेत जाण्याचा रस्ता शोधण्यात मदत करा.

चित्रात शाळा शोधा. रूचिराला घरापासून शाळेपर्यंत पोहचवा.





## विचार करा आणि लिहा :

❋ रूचिराच्या घरापासून शाळेकडील रस्त्यावर कोणत्या वस्तू आणि जागा येतात? त्यांची नावे लिहा.


| तिच्या उजवीकडे काय येते? | तिच्या डावीकडे काय येते ? |
| --- | --- |
| ● | ● |
| ● | ● |
| ● | ● |
| ● | ● |
| ● | ● |
| ● | ● |



## शोधून काढा :


❋ रूचिराला तिच्या घरापासून शाळेच्या रस्त्यावर किती वळणे घ्यावी लागतात?

निशाणीला (चिह्न) ओळखा आणि त्याचे नाव लिहा.




तुम्ही सांगू शकाल का? ह्या निशाण्या कशासाठी उपयोगात घेण्यात येतात?

तुमची स्वत:ची निशाणी बनवा. ही निशाणी आधीच्या निशाणीपेक्षा वेगळी असणे आवश्यक आहे. आता तुम्ही बनविलेली निशाणी खाली दिलेल्या नकाशात ठेवा. नकाशातच निशाणी बनविणे.



**निशाणीसाठी सूचि**

रूचिराचे घर

शाळा

पोस्ट ऑफिस

झाड

हॉस्पिटल

बस-स्टॉप

विहीर

दुकान

दरवाजा

घर

बालकांना नकाशात निशाणींची गरज समजवा. बालकांनी बनविलेल्या निशाणीची वर्गात चर्चा करणे हे खूपच उपयोगी रसप्रद राहिल.


## वाचा आणि काढा :

❋ शब्द वाचा आणि त्यासाठीची चित्र काढा :

| | | |
|---|---|---|
|  | | |
| झाड | घर | मकान |
| | | |
| शाळा | हॉस्पिटल | दूध डेअरी |
| | | |
| पोस्ट ऑफिस | | |

## वाचा आणि लिहा :

❋ नकाशाच्या आधारे माहिती लिहा :




♦ नकाशात किती घरे आहेत? ______________________

♦ नकाशात किती दुकाने आहेत? ______________________

♦ नकाशात किती झाडे आहेत? ______________________

- नकाशात किती हॅन्डपंप आहेत? ____________________

- पोस्ट-ऑफिस किंवा हॉस्पिटलपासून सर्वात जवळ काय आहे? ____________

- बस स्टॅन्डच्या जवळ काय आहे? ____________________

- निशाणीच्या यादी शिवाय तुम्ही नकाशा वाचू शकाल खरे?

  ______________________________________________

❇ तुम्ही गणितात शिकले असाल, तशाच निशाण्या येथे लिहा.

______________ ______________ ______________


______________ ______________ ______________

तुमच्या घरापासून शाळेपर्यंत पोहचण्याचा नकाशा काढा :

हा नकाशा बनविण्यासाठी बालकांना मार्गदर्शन द्यावे.

# २३ सुंदर कपडे

लहान मुलगी साजीदा. तिला एक बहिण. बहिण तिच्याहून मोठी. मोठ्या बहिणीने सुंदर ओढणी दिली. ओढणीमध्ये सुंदर भरतकाम आणि काच लावलेले होते. संध्याकाळचे जेवण झाल्यानंतर, साजीदाने ही ओढणी घालण्याचा प्रयत्न केला. ओढणी सोबत खेळता खेळता ती थकली. ओढणी ओढून झोपी गेली. ती झोपेत पण ओढणी विषयी विचार करत होती : 'सुंदर ओढणी कशा प्रकारे बनविण्यात आली असेल?'



### विचार करा आणि सांगा :

साजीदाची ओढणी कशा रितीने बनविण्यात आली असेल?

❋ ओढणी किंवा शिवल्या शिवायचे कापड घ्या. त्याचे वेग-वेगळ्या रितीने कपडे घाला. तुम्ही त्याला किती प्रकारे घालू शकले?

❋ कोणी त्याला लूंगीप्रमाणे घालण्यास किंवा पगडी बांधण्यासाठी उपयोगात घेतली? दुसऱ्या कोणत्या रितीने त्याला घालू शकतो?

तुमच्या घरात कोणतेही कपडे पहा. तुम्हाला त्याच्या रचनेत, त्याच्या रंगात आणि त्याच्या नक्षीमध्ये काय फरक वाटतो त्याची नोंद करा.

| कापडाचे नाव | कापडाची रचना | रंग | नक्षी/डिझाईन |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |




❋ जाड कापड किंवा पोते (गोणपाट) सावधानीपूर्वक पहा. तुम्ही त्याच्या लांबी आणि रूंदीमध्ये दोरे पाहू शकता का?

❋ जेंव्हा तुम्ही कापडाला जवळून पहाल तेंव्हा त्याच्या रेषा तंतू व्यवस्थित पहावयास मिळतील. तुम्ही अशारितीने कागद पण विणू शकतात.

❋ तुम्ही अशा रितीने कागद पण विणू शकतात.

## कागदाचे विणकाम



१. दोन वेग वेगळ्या रंगाचे कागद घ्या.

२. एका कागदावर उभी (|) आणि दुसऱ्या कागदावर (—) रेखा बनवा.


३. दोन्ही कागद निशाणी केलेल्या रेषे पर्यंत कापा. लक्षात ठेवा की पट्ट्या संपूर्णपणे वेगळ्या व्हायला नकोत.

४. चित्रात दाखविल्याप्रमाणे एका कागदाला दुसऱ्या कागदावर त्याच्या धार प्रमाणे लावा. (सर्व) कडा योग्य रितीने चिकटवा.

५. आता पट्ट्यांनी चटाई बनविण्यासाठी कागदाला लावा.

६. चटईच्या टोकावर पट्टी किंवा कागदाची कडा बनवा. ज्यामुळे चटई खुलणार नाही.

## ❊ कापडावरील छापकाम



पाठ ''वनपरी'' मध्ये तुम्ही फुलांची रचना आणि कापडावर बनलेली पाने पाहिली.

भाजीपाला कापून तुम्ही पण त्याच्या उपयोगाने अशी रचना बनवू शकतात.


फ्लावर किंवा भेंडी कापा. कापलेल्या भागावर रंग लावा आणि कागद किंवा कापडाच्या तुकड्यावर तुमची स्वत:ची रचना बनवा.

## ❊ रंग भरा :

विविध फळांद्वारे छापकाम करा.

'कागद विणकाम' आणि 'कापडावरील छापकाम' ची प्रवृत्ती बालकांची स्वत:ची पारंपारिक कलेच्या सोबत संबंधित करण्यासाठी उपयोगी होईल. बालकांना त्यांची सर्जनात्मकता दाखविण्याची संधी मिळेल.

# २८ जीवनाचे जाळे




आत्तापर्यंत तुम्ही कितीतरी पुस्तक पाहिली असतील. तुम्ही वृक्ष, पाणी, घर, हवा, सूर्य आणि कितीतरी वस्तूंविषयी माहिती करून घेतली. तुम्ही या सगळया विषयी विचार पण केला असेल. तुम्ही सांगू शकता का आपण का या सर्व वस्तू विषयी विचार करतो किंवा त्या विषयी समजण्याचा प्रयत्न करतो ?




चित्रात दाखविलेल्या वस्तूंसोबत आपण कशा रितीने जुळलेले आहोत? चला शोधून काढू या.

* ◯ मध्ये तुमचे चित्र काढा.

- जीवनात आवश्यक असतील अशा चित्रांना रेषेद्वारे वस्तूसोबत जोडा.
- तुम्ही तुमचे चित्र घरासोबत जोडले ?
- चला पाहुया, दुसऱ्या कोणत्या वस्तूंसोबत आपण घराला पण जोडू शकतो.
- विचार करा, घर कशाचे बनलेले आहे ?
    - लाकूड – जे वृक्षापासून मिळते.
    - विट – जी पाणी आणि मातीपासून बनते.
    - माती – आपण जमिनीमधून मिळवितो, आणि
    - पाणी – आपल्या तेथील नदी, तलाव, विहीर, अथवा पावसापासून मिळवितो.

तुम्ही पाहिले की घर बनविण्यासाठी काय पाहिजे आणि ते कशारितीने मिळवू शकतो.

याचरितीने, इतर वस्तूंना संबधित माहिती सोबत जोडा. असे करतांना, तुम्हाला दुसऱ्या थोड्या जास्त वस्तूंची नाव लिहिण्याची गरज पडेल. शेवटी तुम्हाला काय पहायला मिळाले ? एक मोठे जाळे ! खरे ना ? या जाळ्यावरून तुम्ही काय समजू शकले ?

## विचार करा आणि लिहा :

खाट बनविण्यासाठी कोण-कोणत्या सामग्रीची गरज पडेल ?


## विचार करा आणि लिहा :

- खाट ऐवजी दुसऱ्या कोण-कोणत्या वस्तू वापरू शकाल ?

बालकांनी बनविलेल्या जाळ्याद्वारे तुम्हाला पर्यावरणातील वस्तू एकमेकांवर निर्भर आहेत तसे सांगून प्रोत्साहित करा. या विषयावर चर्चा त्यांना वर्गात जाळे बनविण्यास मदत करेल.

# माझा तालुका

२५




हे ऋचनचे गाव आहे.

ऋचन जेपूर मध्ये राहते.

जेपूरच्या आसपासच्या गावाची माहिती दिलेली आहे. या माहिती वरून चर्चा करा.

## विचार करा आणि सांगा :

- तुमच्या गावाच्या आसपास कोणती गावे आहेत ?
- तुमचे गाव कोणत्या तालुक्यात आहे ?



माझे नाव ______ आहे.

मी ______ मध्ये राहतो.


माझ्या गावाच्या आसपास खालील प्रमाणे गांव आहेत.

## आठवण करा आणि लिहा :

आसपासच्या गावांची नावे लिहा.

| | |
|---|---|
| | |
| | |

आसपासच्या गावांविषयी आपण पाहिले. गुजरात मध्ये आता दोनशे पन्नास तालुके आहेत. प्रत्येक तालुक्यात विविध गाव आलेली असतात. कित्येक गावांचा समूह मिळून तालुका बनतो. आपण आपल्या तालुक्या संदर्भात माहिती तयार करू या.




ही रतनच्या तालुक्याची माहिती आहे.

बडोदा जिल्हयाच्या विविध तालुक्यांची माहिती देण्यात आली आहे. या माहितीच्या आधारे चर्चा करा.

## विचार करा आणि सांगा :

- येथे दुसरे कोण कोणते तालुके आहेत ?
- आपला तालुका कोणत्या जिल्ह्यात आहे ?



माझ्या गावांचे नाव ________ आहे.

माझे गाव ________ तालुक्यात आहे.

माझ्या तालुक्याच्या आसपास इतर तालुके पण आलेली आहेत.

## पहा आणि लिहा :

आजूबाजूच्या तालुक्याची नावे लिहा :

| | |
|---|---|
| | |

आपल्या आजूबाजूला अनेक गावं आहेत.

विविध गावांनी तालुका बनतो.

कित्येक तालुक्यांच्या समूहाने जिल्हा बनतो. सगळ्यांचे गाव, तालुका आणि जिल्हा विविध रितीने वेगळी ओळख असते. आपल्या तालुक्यात काय-काय विशेष आहे त्या विषयी नोंद करू या.



## विचार करा आणि लिहा :

आपल्या तालुक्या विषयी माहिती समजा आणि लिहा.

| | | | |
|---|---|---|---|
| **पशु** | | | |
| **वाहन** | | | |
| **धार्मिक स्थळे** | | | |
| **प्रेक्षणिय स्थळे** | | | |
| | | | |
| | | | |



## वाचा आणि सांगा :

आपल्या आजूबाजूची गावं आपले शेजारील गाव म्हटले जातात. आपल्या तालुक्याच्या आजूबाजूचे तालुके आपले शेजारील तालुके आहेत.

कित्येक वेळा शेजारील गाव सुद्धा दुसऱ्या तालुक्यात असू शकते. आजूबाजूच्या गावां विषयी समजा.



## विचार करा आणि लिहा :

| तालुक्याचे नाव | गावाचे नाव | कोण राहते | काय करतात? |
|---|---|---|---|
| मेघरज | बांठीवाडा | मोटाभाई | नोकरी |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

असे इतर तालुके आणि गावा विषयी माहिती मिळवा आणि अन्य मित्रांना माहिती सांगा.

# नोंद

# फनपेज-१

